॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com
अहिल्यानगर । मंगळवार, दि. ५ मे २०२६ । वर्ष ६ वे । अंक २४९ वा । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MAHMAR / 2012 / 47715 । 9420802145

*** सुविचार ***
दुसऱ्याला शिकवीत असतांना माणूस स्वतःला शिकवीत असतो.

## SPOT NEWS

### बारामतीत मोठ्या मत्ताधिक्याने सुनेत्रा पवार विजयी

● **पुणे** – बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या निकालाचे चित्र आता स्पष्ट झाले असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) उमेदवार आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी विजयाकडे मोठी झेप घेतली आहे. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी विक्रमी कामगिरी करत माजी आमदार अजित पवार यांच्या २०१९ मधील मताधिक्याचे सर्व रेकॉर्ड मोडीत नवा रेकॉर्ड बनवला आहे. २४ च्या फेरीअखेर मिळालेल्या आकडेवारीनुसार, सुनेत्रा पवार यांचा विक्रमी विजय झाला आहे. सुनेत्रा पवार २ लाख १८ हजार ९३० इतक्या विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्या आहेत. देशात सगळ्यात जास्त मताने निवडून येण्याचा विक्रम सुनेत्रा पवारांच्या नावाने आज झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी, जय पवार आणि पार्थ पवार यांनी सुनेत्रा पवारांना विक्रमी मतांनी निवडणून देण्याचं आवाहन केलं होतं, त्याचबरोबर सर्व पक्षांनी आणि संघटनांनी देखील सुनेत्रा पवारांना पाठिंबा दिला होता, तर दुसरीकडे सुनेत्रा पवारांच्या विरोधात उभ्या राहिलेल्या एकाही उमेदवाराला हजारापेक्षा जास्त मते देखील पडली नसल्याचं दिसून येत आहे. करूणा मुंडे यांना १२५ मते मिळाली आहेत, तर अभिजित बिचुकले यांना १२१ मते मिळाली आहेत.

### तमिळनाडूत ‘थलपती’चा सुपरस्टार विजय

● **मुंबई** – तमिळनाडूच्या राजकारणात आज एका नवीन युगाची सुरुवात झाली आहे. दाक्षिणात्य सुपरस्टार जोसेफ विजय चंद्रशेखर ऊर्फ ‘थलपती’ विजय याच्या ‘तमिळगा वेत्री कळघम’ (ढतघ) पक्षाने विधानसभा निवडणुकीत जोरदार मुसंडी मारत प्रस्थापित राजकारण्यांना घाम फोडला आहे. सुरुवातीच्या कलानुसार आणि ताज्या आकडेवारीनुसार, विजयच्या पक्षाने सत्ताधारी द्रमुक (ऊव्घ) आणि काँग्रेसच्या युतीला जबरदस्त धक्का दिला असून, राज्यात ‘तिसरा पर्याय’ म्हणून स्वतःचे स्थान पक्के केले आहे.

# राहुरीत भाजपाच्या अक्षय कर्डिलेंचा दणदणीत विजय

## राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या उमेदवाराचे डिपॉझिट जप्त । मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व विखे पिता-पुत्रांची खेळी यशस्वी

● **राहुरी । वीरभूमी** –

राहुरी-नगर- पाथर्डी विधानसभा पोटनिवडनिवडणुकीत भाजपाचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी तब्बल १ लाख ४० हजार मते मिळवून प्रतिस्पधी राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.गट) पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांचा दारूण पराभव केला. गोविंद मोकाटे यांना फक्त २७ हजार ५०६ मते मिळाली. यामुळे या निवडणुकीत मोकाटेसह सर्वच सहा उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. निवडणूक जाहीर होताच तनपुरेंनी माघार घ्यावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व विखे पिता-पुत्रांची रणनिती यशस्वी झाली.



राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधी आ. शिवाजीराव कर्डिले यांचे निधन झाल्यानंतर जाहीर झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपाने अक्षय कर्डिले यांना उमेदवारी देत निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. त्याचबरोबर माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी उमेदवारी करु नये यासाठी त्यांनी केलेली मनधरणी आणि विखे पिता-पुत्र यांनी आखलेली रणनिती यशस्वी झाली. अक्षय कर्डिले यांच्यासाठी माजी खा. सुजय विखे यांनी सर्व प्रचार नियोजनापासून ते घेतलेल्या बैठकामुळे कर्डिलेंचा विजय सुकर झाला.

पोटनिवडणुकीच्या मतमोजणीला काल सकाळी ८ वाजता राहुरीच्या धुमाळ महाविद्यालयात प्रारंभ झाला. टपाली मतदानापासूनच भाजपाचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी आघाडी घेण्यास सुरूवात केली. टपाली मतदानात कर्डिले यांना २८३ तर गोविंद मोकाटे यांना ५६ मते मिळाली.

अंतिम फेरी अखेर भाजपाचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी १ लाख ४० हजार ९३ मते घेऊन प्रतिस्पर्धी उमेदवाराचा १ लाख १२ हजार ५८७ मतांनी पराभव केला. विशेष म्हणजे प्रमुख विरोधी असलेल्या राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांच्यासह सर्व सहा उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. निकालानंतर यावेळी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी मुक्तपणे गुलालाची उधळण करून जल्लोष साजरा केला.

### बदललेल्या राजकीय समीकरणांचा फायदा

■ प्राजक्त तनपुरेंच्या माघारीनंतरही निवडणूक झाली आणि अखेर थेट लढतीत भाजपने बाजी मारली. या निकालामुळे राहुरीतील राजकीय समीकरणे बदलली असून भाजपने आपली ताकद पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. एकंदरीत, तनपुरे यांच्या माघारीपासून ते शेवटच्या क्षणापर्यंत घडलेल्या राजकीय घडामोडींनी राहुरी पोटनिवडणूक अत्यंत नाट्यमय बनवली. मात्र शेवटी संघटनशक्ती, रणनीती आणि नेतृत्वाच्या जोरावर अक्षय कर्डिले यांनी दणदणीत विजय मिळवत भाजपचा झेंडा उंचावला. अक्षय कर्डिले यांनी आपले वडील दिवंगत शिवाजीराव कर्डिले यांच्यापेक्षाही जास्त मतांनी विजय मिळवला असून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांचे डिपॉझिट जप्त होणार आहे.

## एकाच दिवसात ९ बालविवाह थांबविण्यात प्रशासनाला यश

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

महिला व बालविकास विभागाच्या सतर्कतेमुळे जिल्ह्यात एका दिवसात एकूण ९ बालविवाह थांबविण्यात प्रशासनाला यश मिळाले आहे. या कारवाईमुळे बालविवाह प्रतिबंधाबाबत प्रशासनाची सजगता अधोरेखित झाली आहे.

दि. ३ मे २०२६ रोजी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात आली. या कारवाईत नगर शहरात ३, अकोल्यात १, राहुरीत १, श्रीगोंद्यात १, पाथर्डीत १, नेवाशात १ आणि नगर तालुक्यात १ असे एकूण ९ बालविवाह थांबविण्यात आले.

या मोहिमेत पोलीस यंत्रणा, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, अंगणवाडी सेविका, मुख्यसेविका, जिल्हा बालसंरक्षण कक्ष तसेच चाइल्ड हेल्पलाइन कक्ष यांचा सक्रिय सहभाग राहिला.

सर्व यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय साधून ही कारवाई करण्यात आली. नागरिकांनीही अशा घटनांची माहिती तत्काळ प्रशासनाला द्यावी व सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पारनेरमध्ये महिला डॉक्टरची आत्महत्या; सासरच्यांवर गुन्हा दाखल

● **पारनेर । वीरभूमी** –

लग्नानंतर माहेरहून १२ लाख रुपयांची मागणी, शिवीगाळ, दमदाटी आणि सततच्या मानसिक छळाला कंटाळून २६ वर्षीय महिला डॉक्टरने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना पारनेर तालुक्यातील गोरेगाव येथे घडली आहे. डॉ. गौरी सुनिल चौरे (वय २६, रा. काळपट्टी वस्ती, गोरेगाव, ता. पारनेर) असे या दुर्दैवी तरुणीचे नाव आहे. याप्रकरणी तिच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून पती अमित बाबासाहेब दळवी, सासू संगीता बाबासाहेब दळवी व सासरे बाबासाहेब हरीभाऊ दळवी यांच्यावर आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



तक्रारदार सुनिल जबाजी चौरे (वय ५४, रा. गोरेगाव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरीचे लग्न २३ नोव्हेंबर २०२४ रोजी अमित बाबासाहेब दळवी (रा. तपोवन रोड, अहिल्यानगर; सध्या कामोठा, मुंबई) यांच्याशी मोठ्या थाटामाटात झाले होते. लग्नानंतर सुरुवातीचे तीन महिने अहिल्यानगर येथे सर्व काही सुरळीत होते. त्यानंतर हे जोडपे मुंबईतील कामोठा येथे वास्तव्यास गेले. गौरीने खाजगी रुग्णालयात नोकरी सुरू केली होती, परंतु तिचा पगारही सासरच्यांनी काढून घेतला. तसेच, फेब्रुवारी २०२५ मध्ये तिच्या लग्नातील सोन्याचे दागिनेही बळकावून घेतल्याचे तिने आपल्या आई-वडिलांना फोनवरून सांगितले होते. पती अमित हा दारूच्या आहारी जाऊन पैसे मागण्यासाठी तिला मारहाण करत असे. गौरीने वेळोवेळी आपल्या आई-वडिलांना आणि काकांना याबाबत माहिती दिली होती.

२७ एप्रिल २०२६ रोजी गौरी, तिचा पती अमित आणि सासरे बाबासाहेब हे गोरेगाव येथे आले. त्यावेळी अमितने, तू इथेच थांब, मी पप्पांना नगरला सोडून तुला घ्यायला येतो, असे सांगून तो निघून गेला. त्यानंतर तो परत आला नाही आणि कोणाचेही फोन उचलले गेले नाहीत. २८ एप्रिल २०२६ रोजी गौरी व तिची आई अहिल्यानगर आणि मुंबई येथे गेली, परंतु दोन्ही ठिकाणी घराला कुलूप होते. त्यानंतर ०२ मे २०२६ रोजी गौरी घरात एकटी असताना सकाळी साडेसात ते साडेआठच्या दरम्यान तिने छताच्या हुकाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली.

# कृषी सेवा केंद्रांवर साठा व दर दर्शविणारे फलक अनिवार्य : पालकमंत्री डॉ. विखे पाटील

## राहाता तालुक्याची खरीप पूर्व हंगाम नियोजन बैठक संपन्न

● **शिर्डी । वीरभूमी** –

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची कोणतीही अडवणूक खपवून घेतली जाणार नाही. सर्व अधिकाऱ्यांनी केवळ कार्यालयात न बसता थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन काम करावे. कृषी सेवा केंद्रांबाहेर खतांचा साठा व दर दर्शविणारे फलक लावणे अनिवार्य असून, शेतकऱ्यांना अनावश्यक वस्तू खरेदी करण्यास सक्ती केल्यास संबंधितांचे परवाने रद्द करून कडक कारवाई करण्यात यावी. तसेच पावसाळ्यात जळलेली वीज रोहित्रे ४८ तासांच्या आत बदलून द्यावीत, असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

राहाता तालुक्याची खरीप पूर्व हंगाम नियोजन बैठक पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, शिर्डी नगराध्यक्षा जयश्री थोरात, राहाता नगराध्यक्ष स्वाधीन गाडेकर, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व शिर्डी उपनगराध्यक्ष अभय शेळके आदी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, हवामानातील बदलांमुळे उद्भवणाऱ्या संकटांबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करणे अत्यावश्यक आहे. पावसाचा खंड पडल्यास पिके टिकवण्यासाठी ८५ ते ९० दिवसांत येणाऱ्या वाणांची शिफारस कृषी विभागाने करावी. तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत शासनाच्या सर्व उपाययोजनांची माहिती पोहोचवण्यासाठी माहितीपुस्तिका तयार करून ती प्रत्येक ग्रामपंचायतीमार्फत वितरित करावी. कृषी सहाय्यकांच्या भेटीचे दिवस व संपर्क क्रमांक ग्रामपंचायतीबाहेर ठळकपणे प्रदर्शित करावेत, अशी सूचना त्यांनी केली.

शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना तंत्रज्ञानसाक्षर करणे आवश्यक आहे. मजुरांची टंचाई लक्षात घेता फवारणीसाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करावा. तसेच शेतीमालाचे रोजचे बाजारभाव समजण्यासाठी क्यूआर कोड तयार करून तो सर्वत्र प्रदर्शित करावा. अल्पभूधारक शेतकऱ्यांना महागडी अवजारे घेणे शक्य नसल्याने गावागावांत अवजार बँक स्थापन करावी. ठिबक सिंचनाचा अवलंब वाढवून पाण्याचा काटेकोर वापर करण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पीक कर्जवाटपाचा आढावा घेताना पालकमंत्र्यांनी बँकांच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. पीक कर्जासाठी सिबिल गुणांची अट शासनाने शिथिल केलेली असतानाही बँका शेतकऱ्यांची अडवणूक करत असतील, तर संबंधित शाखाधिकाऱ्यांवर थेट कारवाईचा प्रस्ताव पाठवावा.



खरिपाच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक सहाय्य आवश्यक असल्याने कर्जवाटप निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात यावे, असे निर्देश त्यांनी दिले.

सौर कृषी पंपासाठी पैसे भरूनही तो न मिळणे तसेच कंत्राटदारांकडून शेतकऱ्यांच्या पाइपलाइनचे होणारे नुकसान याबाबत तातडीने चौकशी करून संबंधित कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना जाब विचारावा. मान्सूनपूर्व कामे तातडीने पूर्ण करावीत. तसेच नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना त्वरित मदत मिळावी यासाठी तहसीलदारांनी २४ तास कार्यरत आपत्ती व्यवस्थापन कक्ष सुरू करावा.

रासायनिक खतांचा अतिवापर टाळण्यासाठी प्रबोधन मोहीम राबवावी व नॅनो युरियाच्या वापराचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना बांधावर जाऊन दाखवावे. सेंद्रिय शेती व आधुनिक तंत्रज्ञानाचा यशस्वी वापर करणाऱ्या तालुक्यातील उत्कृष्ट शेतकऱ्यांची नावे माहितीपत्रकात समाविष्ट करून इतरांना प्रोत्साहित करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

बैठकीपूर्वी पालकमंत्र्यांच्या हस्ते ‘कृषी यांत्रिकीकरण योजना’अंतर्गत निवडक लाभार्थी शेतकऱ्यांना आधुनिक कृषी साधनांचे वाटप करण्यात आले. साकुरी येथील शशिकला दंडवते व रमेश बनसोडे, न.पा.वाडीचे विशाल वहाडणे, चोळकेवाडीचे सुभाष चोळके, अस्तगावचे रामदास जेजुरकर आणि पिंपरी निर्मळ येथील आशा निर्मळ यांना ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले. तसेच पिंपळवाडी येथील लीलाबाई तूरकणे यांना हार्वेस्टर, तर दाढ बुद्रुक येथील प्रशांत बनसोडे यांना कृषी ड्रोन प्रदान करण्यात आले.

# SPOT NEWS

## उपमहापौर धनंजय जाधव चषक जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर महानगरपालिकेचे नवनिर्वाचित उपमहापौर धनंजय जाधव यांच्या नावाने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ उत्साहात पार पडला. अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित ही स्पर्धा ७, ९, १३ व १९ वर्षांखालील खेळाडूंसाठी घेण्यात आली आहे. गायत्री मंगल कार्यालय, महाजन गल्ली येथे पार पडलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन उपमहापौर धनंजय जाधव व संघटनेचे सचिव यशवंत बापट यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन करण्यात आले. या वेळी खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त श्याम कांबळे, पारुनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी, पंच देवेंद्र ढोकळे, प्रशांत घंगेकर, चेतन कड, मनिष जसवानी तसेच खेळाडू व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेचे प्रास्ताविक करताना सचिव यशवंत बापट यांनी सांगितले की, जिल्ह्यातील अनेक दिग्गज खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले असून स्पर्धा दर्जेदार व रोमहर्षक ठरणार आहे. तसेच संघटनेला दरवेळी हॉल भाड्याने घ्यावा लागतो, त्यामुळे महानगरपालिकेमार्फत कायमस्वरूपी हॉल उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी यावेळी मांडली. या स्पर्धेतून निवड झालेल्या खेळाडूंमधून अहिल्यानगर जिल्ह्याचा मुलांचा व मुलींचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निश्चित करण्यात येणार आहे. प्रत्येक वयोगटातील पहिल्या पाच मुला-मुलींना उपमहापौर धनंजय जाधव करंडक देऊन गौरविण्यात येणार आहे. अहिल्या नगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रकाश गुजराथी यांनी केले.

## अवतार मेहेरबाबा ट्रस्ट कर्मचारी युनियनची अरणगावात बैठक

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

कामगारांनी आजवर जे काही मिळवले आहे, ते केवळ संघर्षाच्या आणि एकजुटीच्या जोरावरच मिळाले आहे. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आपली संघटना अधिक मजबूत करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन अवतार मेहेरबाबा कामगार युनियनचे युनिट अध्यक्ष कॉ. सतीश पवार यांनी केले. अरणगाव येथे लाल बावटा जनरल कामगार युनियन संलग्न 'अवतार मेहेरबाबा ट्रस्ट कर्मचारी युनियन' ची कामगार दिनानिमित्त बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षीय भाषणात पवार बोलत होते. प्रारंभी कामगार युनियनच्या फलकाचे पूजन करण्यात आले. उपस्थित कामगारांनी कामगार एकजुटीचा विजय असो आणि लाल बावटा झिंदाबाद अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला.पुढे पवार म्हणाले की, १८८६ च्या शिकागो आंदोलनापासून सुरू झालेला कामगारांचा लढा आजही संपलेला नाही. ८ तास काम आणि कामाचा मोबदला हा आमचा घटनात्मक हक्क आहे. हक्कांसाठी लढा: मेहेरबाबा ट्रस्टमध्ये कार्यरत असणाऱ्या प्रत्येक कामगाराच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या कायदेशीर हक्कांच्या संरक्षणासाठी युनियन सदैव कटिबद्ध राहील, असे त्यांनी सांगितले. तर कोणत्याही दबावाला बळी न पडता कामगारांनी संघटनेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे त्यांनी आवाहन केले. या सभेला युनियनचे मार्गदर्शक ॲड. कॉ. सुभाष लांडे (जिल्हा सचिव) आणि ॲड. कॉ. सुधीर टोकेकर (जिल्हा कार्याध्यक्ष) यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सभेच्या नियोजनात संजय कांबळे, सुनील दळवी, बबन भिंगारदिवे यांनी विशेष पुढाकार घेतला. याप्रसंगी गणेश गहिले, सुभाष शिंदे, प्रविण भिंगारदिवे, राजू मोरे, श्रीनिवास वंगार व इतर कर्मचारी हजर होते.

# साळवण देवी रस्त्यावरील चिकन दुकाने बंद करा

### ग्रामस्थांची नगरपरिषदेकडे निवेदनाद्वारे मागणी | घाणीच्या प्रकारामुळे नागरिक संतप्त

**श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्रीगोंद्यातील साळवण देवी रस्ता परिसरात चिकन विक्रेत्यांकडून होणाऱ्या अस्वच्छतेमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, संबंधित दुकाने तात्काळ बंद करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. रविवारी रात्री साडेनऊच्या सुमारास एका चिकन विक्रेत्याने दुकानातील घाण थेट रस्त्यावर टाकल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

घटनेनंतर स्थानिक तरुणांनी संबंधित विक्रेत्याला जाब विचारला. यापूर्वीही अनेक वेळा सूचना देऊनही तो दखल घेत नसल्याचे नागरिकांनी सांगितले. मात्र रविवारी रात्री तरुण एकत्र आल्याने संबंधित विक्रेत्याने नरमाईची भूमिका घेतली. सोमवारी दि.४ रोजी सकाळी साडेदहा वाजता साळवण देवी रोड परिसरातील युवक मोठ्या संख्येने एकत्र येत पालिकेच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावून परिस्थितीची पाहणी करून घेतली. त्यानंतर नागरिकांनी नगर परिषदेत जाऊन निवेदन देण्याचा निर्णय घेतला.



मुख्याधिकारी रजेवर असल्याने हे निवेदन नगराध्यक्ष सुनीताताई खेतमाळीस व उपाध्यक्ष अलकाताई अनभुले यांच्या समक्ष सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की साळवण देवी माता हे तालुक्याचे श्रद्धास्थान असून, मुख्य रस्त्याच्या सुरुवातीलाच मोठ्या प्रमाणात चिकन दुकाने असल्याने परिसरात अस्वच्छता पसरली आहे. देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना याचा त्रास होत असून, त्या ठिकाणी धार्मिक वस्तूंची दुकाने असावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच चौकाचे सुशोभीकरण करून माता साळवण देवी चौक असे नामकरण करावे व प्रवेशद्वार उभारावे, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे नाना शिंदे यांनी केली. युवक कार्यकर्ते सागर कोथिंबिरे यांनी संबंधित ट्रस्टचे अध्यक्ष व रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

यावेळी संतप्त नागरिकांनी नगराध्यक्षांच्या दालनात ठिय्या आंदोलन करत लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय न हलण्याची भूमिका घेतली. नगर परिषद प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनानुसार, संबंधित चिकन व मासे विक्रेत्यांना परवानगी देण्यात आलेली नसून, सदर जागा ट्रस्टची आहे. ट्रस्टला दुकाने बंद करण्याचे आदेश देण्यात येणार आहेत. तसेच विक्रेत्यांना कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याबाबत नोटीस बजावली जाणार असून, नियमांचे उल्लंघन केल्यास फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा देण्यात आला. पुढील दोन दिवसांत परिसरातील घाण साफ करण्यात येईल व भविष्यात स्वच्छता राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

या आंदोलनात युवक कार्यकर्ते सोनू कोथिंबिरे, कालिदास कोथिंबिरे, सागर रसाळ, गजानन कोथिंबिरे, सूरज कोथिंबिरे, प्रज्वल कोथिंबिरे, विशाल कोथिंबिरे, निखिल कोथिंबिरे, आजिनाथ जाधव, पांडुरंग लोखंडे, गोरख शिंदे, प्रवीण जगताप, भीमराव मखरे, धनराज कोथिंबिरे, संगीता अशोक कोथिंबिरे, माजी नगरसेवक एस. पी. कोथिंबिरे यांच्यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सार्वजनिक स्वच्छतागृहांचा प्रश्न सुटणार १ कोटी ३० लाख निधी मंजूर : नगराध्यक्ष पराग संधान

**कोपरगाव । वीरभूमी–**

शहरातील सार्वजनिक स्वच्छतेचा दीर्घकालीन प्रश्न आता मार्गी लागणार असून स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० अंतर्गत कोपरगाव नगरपरिषदेस सामुदायिक व सार्वजनिक शौचालये तसेच स्वच्छतागृहांच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीसाठी तब्बल १ कोटी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात ७५ सीट्सना मंजुरी मिळाली असून लवकरच आणखी ७५ सीट्स मंजूर होण्याची प्रक्रिया सुरू आहे.



नगराध्यक्ष पराग संधान यांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरात येणाऱ्या शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांना तसेच दिवसभर व्यवसायात गुंतलेल्या व्यापाऱ्यांना व महिला भगिनींना स्वच्छ व सुलभ सार्वजनिक स्वच्छतागृहांची मोठी अडचण भासत होती. या पार्श्वभूमीवर शहरातील विविध भागांत आधुनिक, स्वच्छ व सुसज्ज शौचालये उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे नागरिकांची गैरसोय दूर होणार असून शहराच्या स्वच्छतेतही लक्षणीय सुधारणा होईल.

यासाठी मा.आ. स्नेहलताताई कोल्हे व आ. विवेकभैय्या कोल्हे यांचे विशेष सहकार्य व पाठपुरावा झाल्याने हा निधी उपलब्ध होण्यास मदत झाल्याचेही नगराध्यक्षांनी नमूद केले. त्यांच्या पाठपुराव्यामुळे हा निधी मंजूर होऊ शकला असून शहराच्या विकासासाठी हे मोठे पाऊल ठरणार आहे. उपनगराध्य जितेंद्र रणशूर व आरोग्य सभापती वैभव आढाव यांचेही विशेष लक्ष या कामाच्या वेगाने पूर्ततेकडे असणार आहे.

नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने या कामांना लवकरात लवकर सुरुवात करून दर्जेदार व टिकाऊ स्वच्छतागृहांची उभारणी करण्यावर भर दिला जाणार आहे. कोपरगाव शहराला अधिक स्वच्छ, सुंदर आणि सुसज्ज बनविण्यासाठी हा उपक्रम मोलाचा ठरेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

## अभिनव शिक्षण संस्थेचा बारावी विज्ञान शाखेचा ९८.६३ टक्के निकाल; नंदिनी देशमुख प्रथम



**अकोले । वीरभूमी–**

अभिनव शिक्षण संस्था संचलित मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, अकोले यांनी इयत्ता बारावी (विज्ञान शाखा) परीक्षेत यंदाही उज्ज्वल यश संपादन करत ९८.६३% इतका दैदिप्यमान निकाल नोंदविला आहे. या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण अकोले तालुक्यात संस्थेचे कौतुक होत आहे.

या यशात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत आपली गुणवत्ता सिद्ध केली. नंदिनी संदीप देशमुख हिने ८६.३३% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. समीर दिलीप चौधरी याने ८५.३३% गुणांसह द्वितीय, तर तन्वी संदीप डावरे हिने ८१.८३% गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. प्रांजल लक्ष्मीकांत मैड हिने ७७.८३% गुणांसह चतुर्थ स्थान मिळविले. तसेच यशोधन धनंजय हासे आणि सार्थक सुरेश काळे यांनी प्रत्येकी ७६.६७% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे संस्थेचे सुयोग्य मार्गदर्शन, अनुभवी शिक्षकवर्गाची मेहनत व पालकांचे सहकार्य यांचा मोठा वाटा आहे. विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्तबद्ध अभ्यास आणि योग्य नियोजनाच्या जोरावर हे यश मिळविले असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

संस्थेच्या या भरीव यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, सचिव विक्रम नवले, कोषाध्यक्ष तथा वसुंधरा अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, सहसचिव तथा अभिनव पब्लिक स्कूलच्या प्राचार्या अल्फोन्सा डी., वसुंधरा उपप्राचार्या राधिका नवले, पर्यवेक्षक पराग सानप, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख स्मिता पुंड, समुपदेशक आरती जाधव यांनी अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

तसेच प्रा. गुंजाळ पी. जे., देशमुख एस. ए., देशमुख जे. एस., कवडे आर. एस., हासे एम. एम. या सर्व शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या या यशात मोलाचे मार्गदर्शन लाभले. दरम्यान, इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली आहे.

# ज्येष्ठ कलाकारांना दैनंदिन आयुष्यात भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्ट (CAWT) ने सुरु केलेले काम अतिशय कौतुकास्पद

### भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण | ज्येष्ठ कलाकारासाठी काम करणाऱ्या सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्टचे कौतुक

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

अभिनय क्षेत्रातील दिग्गज कलाकारांना आपण सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर पाहतो. या क्षेत्रात मिळणारा पैसा व माया यांची चर्चा आपण ऐकतो. पण प्रसिद्धीच्या पडद्याबाहेर गेल्यावर त्या कलाकारांच्या आयुष्यामध्ये किती दुःख असते ते आपल्याला कधीही दिसत नाही. अशा या जेष्ठ कलाकारांसाठी दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख यांसारख्या कलाकारांनी एकत्र येऊन जेष्ठ कलाकारांचे दुःख, त्यांच्या गरजा, त्यांचे आजारपण यांसारख्या समस्या सोडवण्यासाठी CAWT सारखा एक मंच तयार केला असून या संस्थेतर्फे केले जाणारे काम अतिशय कौतुकास्पद आहे, असे वक्तव्य भाजपचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज मुंबईत केले.

सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्ट (CAWT)आणि सिने अँड टीव्ही आर्टिस्ट असोसिएशनच्या वतीने CAWT च्या स्थापनेत आणि CINTAA - CAWT टॉवरच्या उभारणीत ज्या विश्वस्थ कलाकारांनी आपले अमूल्य योगदान दिले, त्यामध्ये प्रामुख्याने सुप्रसिद्ध अभिनेते दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख, अमरीश पुरी, अमजद खान, चंद्रशेखर वैद्य, दारासिंह या कलाकारांचा सन्मान करण्यासाठी त्या कलाकारांचे फोटो आणि माहिती देणाऱ्या फलकाचे उदघाटन आज भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळेस ते बोलत होते.

रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, अभिनय क्षेत्रातील प्रत्येक कलाकाराचा एक प्रसिद्धीचा काळ असतो. तो चांगला काळ ओसरला कि सरत्या काळात त्या कलाकारांकडे कुणी पाहत नाही. त्यांची कुणी चौकशी करत नाहीत. असे जवळपास ९ ते १० हजार कलाकार सध्या अभिनय क्षेत्रात आहेत. अशा कलाकारांचे दैनंदिन जीवन अतिशय हलाखीचे असते. यामध्ये अभिनय क्षेत्रात काम करणारे इतर कामगार यांची संख्या देखील मोठी आहे. याना सामाजिक जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, अशी माहिती मला CAWT च्या अध्यक्षा प्रीती सप्रू यांनी मला आज दिली. या सर्व समस्यांचे निराकरण करण्याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक




मंत्री आशिष शेलार यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करणार आहे.

तसेच CAWT ला जेष्ठ कलाकारांकरिता मी कोकणातील केसरी, सावंतवाडी येथील माझी स्वतःची एक एकर जागा देण्यास तयार आहे, असे रविंद्र चव्हाण म्हणाले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी रविंद्र चव्हाण यांच्या सोबत जेष्ठ अभिनेत्री व CAWT च्या अध्यक्षा प्रीती सप्रू, ट्रस्टच्या सचिव अभिनेत्री संभावना सेठ, संस्थेचे खजिनदार अभिनेते दीपक पराशर, बॉलिवूड अभिनेते राजपाल यादव, मनोज जोशी, मुकेश ऋषी, आयुब खान, अभिनेत्री कुनिका आणि सिने व टीव्ही क्षेत्रातील अनेक कलाकार उपस्थित होते.

# SPOT NEWS

## वाडी-वस्तीवर पोहचविण्यात आली शासकीय योजनांची माहिती

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, कामगार वर्गाला शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देणे तसेच गावोगावी मोफत आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून आरोग्य सुविधा पोहोचविण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे राबविण्यात आला. या उपक्रमाचा समारोप नगर तालुक्यातील बुरुडगाव येथे उत्साहात पार पडला. या अभियानांतर्गत ग्रामीण भागातील वाड्या–वस्त्यांवर प्रत्यक्ष जाऊन नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. तसेच त्या योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन करून अनेक लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. त्यामुळे तळागाळातील नागरिकांपर्यंत शासनाच्या योजना प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमाला जनकल्याण संस्थेचे अध्यक्ष विनोद साळवे, छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, बुरुडगावचे सरपंच बापूसाहेब कुलट, तलाठी संभाजी ठोंबरे, उपसरपंच सिराज शेख, सामाजिक कार्यकर्ते जालिंदर वाघ, ग्रामविकास अधिकारी दत्तात्रय शेळके, कृषी सहाय्यक मंदा भारती, सी.एच.ओ. प्रतिनिधी, डॉ. मनीषा लगड, सचिन चौधरी, अंगणवाडी सेविका जया जाधव, मुख्याध्यापक झिने सर, मुख्याध्यापिका थोरात मॅडम यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनोद साळवे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. शासनाच्या लोककल्याणकारी योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविणे, त्याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करणे आणि लाभार्थ्यांची नोंदणी करून देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमांतर्गत देरवाडी गटातील निंबोडी, टाकळी काझी, मदडगाव, दशमीगव्हाण, चिंचोडी पाटील, आठवड, सांडवे, मांडवे, नारायण डोह, वाळुंज, देरवाडी, वाकोडी, खंडाळा, अरणगाव आदी गावांमध्ये विविध शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांना ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## इंदुरीचे माजी सरपंच किसनराव देशमुख यांचे निधन

**अकोले । वीरभूमी–**

इंदुरी गावचे माजी सरपंच किसनराव नागुजी देशमुख यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांचे मृत्यूसमयी वय ९२ वर्ष होते. किसनराव देशमुख यांनी गावच्या सरपंच पदासह दूध संस्थेचे चेअरमन पदही भूषवले होते. ते बस्तीराम सारडा यांच्या उंट बिडी उद्योग समूहाचे मॅनेजर होते. त्यांनी इंदुरी येथील सती तारामतीमातेचे मंदिर उभारणी केली आहे. त्यांचे पश्चात पत्नी, मुले अगस्ती विद्यालयाचे निवृत्त शिक्षक शांताराम देशमुख सर, इंदोरीचे माजी उपसरपंच सुभाष देशमुख, माजी प्राचार्य रमेश देशमुख तर नातू जलसंपदा अभियंता अक्षय देशमुख, सचिन कृषी सेवा केंद्राचे संचालक सचिन देशमुख, इंजि. आकाश देशमुख हे आहेत. इंदुरी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.



# संजीवनीच्या बारा विद्यार्थ्यांची स्कॅटरपाय अर्नॅलिटीक्स कंपनीत नोकरी

### संजीवनी इंजिनिअरींग कॉलेज करतेय पालकांची स्वप्नपूर्ती

**कोपरगाव । वीरभूमी –**

संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या प्लेसमेंटच्या विश्वासार्हतेची पून्हा प्रचिती आली. एकाचवेळी बारा विद्यार्थ्यांची स्कॅटरपाय अर्नॅलिटीक्स कंपनीत नोकरीसाठी निवड झाली. अशा प्रकारे संजीवनी पालकांची स्वप्नपूर्ती करीत आहे.

या महाविद्यालयाचा ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग सातत्याने विविध नामांकित कंपन्यांशी संपर्क ठेवून असतो. त्यांच्या गरजेनुसार विद्यार्थी घडवीण्यावर भर असतो. विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात पुढाकार घेतो. या प्रयत्नांना यश मिळत आहे. नुकतेच स्कॅटरपाय अर्नॅलिटीक्स कंपनीमार्फत बारा विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड होणे हे महाविद्यालयाच्या गुणवत्तेचे आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे द्योतक आहे.




स्कॅटरपाय अर्नॅलिटीक्स प्रा. लिमिटेड या डेटा अर्नॅलिटीक्स कंपनीने कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या पायल बाबासाहेब बोर्डे, खुशी मिलींद गुरवे, अथर्व महेश काळे, प्रसाद बबन परजणे, क्रिष्णा रामदास शेलार, सिद्धांत विजय ठोंबरे, श्रुष्टी नितिन वाघमारे, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या पुजा विकास खळेकर, सुशांत उदय नाईक, ऋतुजा योगेश ठोंबरे, इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या यशोदीप शरदकुमार फसळे व प्रथमेश सुरेश जाधव यांची त्यांच्या अंतिम निकाला अगोदरच आकर्षक वार्षिक पॅकेजवर नोकरीसाठी निवड केली.

'संजीवनीमध्ये प्रवेश म्हणजे हमखास नोकरीची हमी' हे समीकरण दिवसेंदिवस अधिक दृढ होते आहे. संस्थेचे अध्यक्ष नितिन कोल्हे यांनी या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. तर कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

> संजीवनी इंजिनीअरिंग कॉलेज हे उद्योगाभिमुख आणि कौशल्याधारित शिक्षण देण्यावर विशेष भर देते. अत्याधुनिक प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापकवर्ग, नियमित औद्योगिक भेटी, तसेच सॉफ्ट स्किल्स आणि तांत्रिक कौशल्यांचे प्रशिक्षण यामुळे येथे शिकणारे विद्यार्थी प्रत्यक्ष उद्योगक्षेत्रातील गरजांनुसार सक्षम बनतात. परिणामी, विविध नामांकित कंपन्यांच्या कठोर निवड प्रक्रियेत हे विद्यार्थी यशस्वीपणे उतरतात. स्वतःची गुणवत्ता सिद्ध करतात.
>
> – **अमित कोल्हे,** कार्यकारी विश्वस्त, संजीवनी शैक्षणिक संकूल

## कु. पूर्वा जाजू वाणिज्य शाखेत अकोले तालुक्यात प्रथम

**अकोले । वीरभूमी–**

एच.एस.सी. बोर्डाचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, त्यामध्ये अकोले येथील कु. पूर्वा जाजू हिने ८७.८३% गुण मिळवत वाणिज्य शाखेत अकोले तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तसेच मॉडर्न कॉलेज, अकोलेच्या कला, वाणिज्य व विज्ञान विभागातही तिने प्रथम येण्याचा मान मिळविला आहे.



कु. पूर्वा ज्योती धनंजय जाजू ही मॉडर्न हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, अकोले येथील विद्यार्थिनी असून तिने विज्ञान, कला व वाणिज्य या तिन्ही शाखांमध्ये प्रथम येत विशेष यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, वाणिज्य शाखेत अकोले तालुक्यात सर्वप्रथम येण्याचा मानही तिने पटकाविला आहे. कु. पूर्वा ही पत्रकार अजय जाजू यांची पुतणी आहे.

मॉडर्न हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, अकोलेचा एकूण निकाल ९३.९०% लागला आहे. विभागनिहाय निकालात विज्ञान शाखेचा ९७.६५%, कला शाखेचा ८४.८४% तर वाणिज्य शाखेचा ९६.१५% असा निकाल लागला आहे. तिन्ही शाखांमध्ये मुलींनीच बाजी मारल्याचे दिसून आले.

मॉडर्न कॉलेजच्या वाणिज्य विभागात कु. पूर्वा जाजू (८७.८३%) प्रथम, कृष्णा राजेंद्र अभंग (८२.५०%) द्वितीय, तर तृप्ती सूर्यभान गजे (८२.३३%) तृतीय क्रमांकावर आहेत.

विज्ञान विभागात गौरी विजय शेलार (८२.६७%) प्रथम, समीक्षा दत्तात्रय उतरडे (७४.५०%) द्वितीय, तर श्रुती भानुदास धुमाळ (७३.६७%) तृतीय क्रमांकावर आहेत.

कला विभागात प्रतीक्षा किसन मालुंजकर (७४.१७%) प्रथम, स्वातिया रशिद तांबोळी (६७.१७%) द्वितीय, तर सपना सोमनाथ मेंगाळ (६६.८३%) तृतीय क्रमांकावर आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## उद्योजक माणिकराव डावरे यांच्याकडून शाळांना ७५ इंची इंटरॅक्टिव्ह पॅनल भेट

### सीएसआर निधीतून स्मार्ट क्लासरूमसाठी १.३० लाखांची मदत

**अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्याचे भूमिपुत्र तथा यशस्वी उद्योजक माणिकराव डावरे यांनी त्यांच्या प्रोफाईव्ह इंजिनिअरिंग कंपनी, कुरुळीच्या सीएसआर निधीतून आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज, विरगाव व जि.प. प्राथमिक शाळा, कुंभेफळ यांना स्मार्ट क्लासरूमसाठी सुमारे १,३०,००० रुपये किमतीचे ७५ इंची इंटरॅक्टिव्ह पॅनल भेट दिले आहे.




आजच्या स्पर्धात्मक युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण मिळावे, या उद्देशाने दोन्ही संस्थांनी कंपनीकडे सीएसआर निधीतून पॅनल उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत उद्योजक माणिकराव डावरे यांनी दोन्ही संस्थांना प्रत्येकी एक इंटरॅक्टिव्ह पॅनल प्रदान केले.

यापूर्वीही माणिकराव डावरे यांनी तालुक्यातील विविध संस्था, महाविद्यालये व शाळांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची जोड मिळत आहे.

या शैक्षणिक योगदानाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, संस्थापक सचिव डॉ. अनिल रहाणे, संचालक सौ. सुप्रियाताई वाकचौरे, सौ. गीताताई रहाणे, शिवराज वाकचौरे, अक्षय रहाणे, सौ. प्रतीक्षा रहाणे, को–ऑर्डिनेटर प्रा. विद्याचंद्र सातपुते, प्राचार्या प्राजक्ता आंबरे–सावंत, सर्व प्राध्यापक, पालक व विद्यार्थी यांनी त्यांचे आभार मानले.

तसेच शेषनारायण डेअरीचे चेअरमन राधाकिसन कोटकर, कुंभेफळ केंद्राचे केंद्रप्रमुख बाळासाहेब आरोटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ कोटकर, संपतराव कोटकर, सुनील कोटकर, यशवंतराव पांडे, मुख्याध्यापक बाळासाहेब गिरी, शिक्षक सुरेश चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विद्यार्थी व शिक्षकांनी आनंद व्यक्त करत उद्योजक डावरे यांचे आभार मानले.

उद्योजक माणिकराव डावरे यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील या योगदानाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर 'छत्रपतीं'च्या शिलेदारांचे दैदिप्यमान यश

### श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात गुणवंतांचा भावूक सत्कार

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

बुद्धी ही केवळ श्रीमंतांची मक्तेदारी नसून, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर कोणतीही अडचण पार करता येते, याचा प्रत्यय पुन्हा एकदा श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या १२ वी बोर्ड परीक्षेतील निकालातून आला आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसह महाविद्यालयात भावूक वातावरणात सत्कार करण्यात आला.

या यशामागे संघर्षाची मोठी कहाणी आहे. काही विद्यार्थ्यांचे वडील रिक्षा चालक, तर काहींचे जीप ड्रायव्हर आहेत. अनेकांच्या आई घरकाम करून संसार चालवत आपल्या मुलांना शिक्षण देत आहेत. अशा परिस्थितीत प्रिती लंभाटे, वैष्णवी गावडे, कार्तिक लबडे आणि मानसी ढवळे यांसारख्या विद्यार्थ्यांनी जिद्दीच्या जोरावर घवघवीत यश संपादन केले. परिस्थिती कितीही कठीण असली तरी ध्येय गाठता येते, हे त्यांनी आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले.

विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय शिवाजीराव नागवडे (बापू) यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या स्वप्नांची पूर्तता करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले. तसेच संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांच्या मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आणि संस्थेचे निरीक्षक प्राचार्य सचिन लगड यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करत, स्पर्धेच्या युगात कोणतीही खासगी शिकवणी न घेता मिळवलेले हे यश अधिक मोलाचे आहे, असे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी मार्गदर्शन करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी सांगितले की, एक विद्यार्थिनी तालुक्यात प्रथम तर दोन विद्यार्थिनी जिल्ह्यात द्वितीय आल्या असून, त्यांनी महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य चंद्रभान कातोरे यांनी केले. त्यांनी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देत 'शिवाजी पॅटर्न'मुळेच हे यश मिळाल्याचे सांगितले. आभार प्रदर्शन विज्ञान विभाग प्रमुख डॉ. मनोहर सूर्यवंशी यांनी मानले. यावेळी प्रा. ऋषिकेश सूर्यवंशी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने पालक व विद्यार्थी उपस्थित होते.




कार्यक्रमादरम्यान कष्टकरी पालकांचा सन्मान होताच संपूर्ण सभागृह भारावून गेले. हे यश केवळ विद्यार्थ्यांचे नसून त्यांच्या पालकांच्या त्यागाचे आणि कष्टाचे प्रतीक असल्याचे सर्वांनी मान्य केले.

> चौकट: मुली सर्वच क्षेत्रात आघाडीवर आज मुली शिक्षण, कला आणि क्रीडा अशा सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत. महाविद्यालयातील मुलींनी आपल्या यशातून हे पुन्हा सिद्ध केले आहे. अशा गुणी विद्यार्थी–विद्यार्थिनींचा आम्हाला सार्थ अभिमान असून त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!
>
> – **सौ. अनुराधा नागवडे,** संचालिका, अहिल्यानगर जिल्हा बँक

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# ऐतिहासिक मिरवणुकीने आमदार विवेक कोल्हे यांचे कोपरगावात स्वागत

## आमदारकीचा सातबारा जरी माझा असेल पण पोट हिश्यात कार्यकर्त्यांची नावे : आ. विवेकभैय्या कोल्हे

**● कोपरगाव । वीरभूमी –** माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांचे आशीर्वाद आणि तळागाळातील सर्व मतदार बंधू भगिनी कार्यकर्ते यांची अलौकिक साथ आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचा विश्वास असे म्हणत युवानते

विवेक कोल्हे यांनी धन्यवाद देवा भाऊ धन्यवाद या घोषणेने कोपरगावचा आसमंत दुमदुमून टाकला.सायंकाळी सहा वाजता सुरू झालेली विजयी मिरवणूक अकरा वाजता आटोपली.

ही एक नवी सुरुवात आहे, पक्ष संघटन वाढवून आपल्याला विकासाचे काम करायचे आहे अशा शब्दात युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांनी कार्यकर्त्यांना विश्वास दिला.केवळ तालुक्यापुरते मर्यादित म्हणून ही जबाबदारी पक्षाने दिली नसून मोठे काम संघटनात्मक दृष्टीने देखील युवा शक्तीच्या साथीने करायचे आहे.

अत्याधुनिक जीप, उंट, घोडे आणि डोक्यावर घेऊन नाचणारे हजारो युवक कार्यकर्ते, फुले, हार, गुच्छ, सुहासिनींचे ठिकठिकाणी औक्षण, पेढ्यांची रेलचेल, मोठमोठे बॅनर, आकाशात फटाक्यांची बहारदार उडवणूक, डीजेचा दणदणाट, भारतीय जनता पक्षाच्या झेंड्यांची भव्य मोटरसायकल व कार रॅली, संबळ, बँड तडमताशाचा लयबद्ध आवाज, सेल्फी आणि रिल्सचा पाऊस, साथीला देवांचा, श्री साईबाबा तपुभूमी मंदिर येथे आशीर्वाद आणि शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्याप्रति विनम्रतेचा आदर असे वर्णन असलेली युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांची विजयी मिरवणूक सर्वांच्याच मनात भरली.

विधान परिषदेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करून कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव थेट मुंबईतून समृद्धी मार्गे स्वागतासाठी आलेल्या युवाशक्तीच्या शेकडो वाहनांच्या ताफ्यात साईबाबा कॉर्नर कोपरगाव येथे विवेकभैय्या कोल्हे शनिवारी सायंकाळी दाखल झाले त्याप्रसंगी विजयी मिरवणुकीचा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे समारोप करताना ते बोलत होते. शहरात त्यांच्या स्वागतासाठी आता थांबायचं नाहीअसा आशय असलेले फलक ठिकठिकाणी लावण्यात आले होते.

विवेक कोल्हे पुढे म्हणाले की, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिन कोल्हे माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली येथून पुढचा राजकीय प्रवास सुरू झाला आहे त्यात सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. अतिशय कमी वयात सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना या मातृसंस्थेच्या अध्यक्षपदापासून आपली कारकीर्द सुरू झाली आहे. कोपरगावच्या राजकीय प्रवाहात अनेक चढउतार आले, २०२४ च्या निवडणुकीत संयम दाखवला त्याचे हे फळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सर्व मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व त्यांचे सर्व पदाधिकारी यांनी दिले, त्यांनी टाकलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करू. या राजकीय प्रवासात आपल्याला कुठेही ऊतमात करायचा नाही असेही ते म्हणाले व कार्यकर्त्यांना कुठेही आता अन्याय सहन करावा लागणार नाही तुमच्या कामांसाठी मी स्वतः दंड थोपटून उभा आहे काळजी करू नका.



आमदारकीचा सातबारा जरी माझ्या नावाने असेल तरी पोट हिश्यात तुमची सर्वांची नावे आहेत त्यामुळे माझ्यासह तुम्ही देखील आमदारच आहात अशा भावनेने जनसेवेसाठी जोमाने कार्यरत राहू.

मिरवणूक प्रारंभी कोल्हे कारखाना कार्यस्थळावर असणाऱ्या श्री हनुमान मंदिर आणि श्री महादेव मंदिर येथे दर्शन घेण्यात आले यावेळी बिपीनदादा कोल्हे, सौ. रेणुकाताई कोल्हे, सर्व संचालक, कारखाना अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

प्रसंगी संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्थेचे विश्वस्त सुमित कोल्हे, ईशान कोल्हे, नगराध्यक्ष पराग संधान यांनी शहरवासीयांच्या वतीने विवेकभैय्या कोल्हे यांचा भव्य मोठा फुलांचा हार घालून नव्या राजकीय कारकिर्दीचा शुभारंभ केला. भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी, संचालक, नगरसेवक, कार्यकर्ते, नागरिक, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चापडगाव कनिष्ठ महाविद्यालयाचा उत्तुंग निकाल



**● शेवगाव । वीरभूमी –** एच. एस. सी. पुणे बोर्डाचा नुकताच निकाल जाहीर झाला. शेवगाव तालुक्यातील कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहातील चापडगाव कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ८३.०८% तर कला शाखेचा ५१.४५% इतका लागला आहे.

कनिष्ठ महाविद्यालयात कु. ढोले गौरी नामदेव हिने ६२.२०% गुण मिळवत प्रथम कु. कांदे वृषाली रंगनाथ हिने ५८.५०% गुण मिळवत द्वितीय तर म्हस्के यशराज राजेंद्र याने ५५.७०% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला.

कला शाखेमध्ये कु. गोरे निकिता जालिंदर हिने ७६% गुण मिळवत प्रथम चि.तऱ्हाळ सौरभ रामेश्वर याने ७२% गुण मिळवत द्वितीय तर चि. जाधव रोहित सचिन याने ७१.५०% गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. विद्यालया मध्ये या यशवंत विद्यार्थांचा प्रशासनातर्फे फाईल व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

या यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधर काकडे, मा. जिल्हा परिषद सदस्या सौ. हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मणराव बिटाळ, उपमुख्यकार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंह भैय्या काकडे, शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर, कांतेश्वर ढोले, प्राचार्य अरुण वावरे, प्र. प्राचार्या अंजली चिंतामण, पर्यवेक्षक अनिल मगर, अशोक आघवणे, दादासाहेब ज्योतिक, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद, पालक, ग्रामस्थ आदिंनी अनिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## समाज व राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी घातक ठरलेल्या जातव्यवस्थेचा अंत करण्याचे कार्य भगवान गौतम बुद्धांनी केले : भदंत राहुल

**● पाथर्डी । वीरभूमी–** हजारो वर्षांपासून देशात श्रमण व ब्राह्मण संस्कृतींची विचारधारा सुरू असून समता, बंधुता, न्याय व मैत्रीचा अंगीकार श्रमण विचारधारा करते, तर जात, धर्म, कर्मकांड व अंधश्रद्धा जोपासत ब्राह्मण विचारधारा शोषणाला खतपाणी घालते, असे परखड मत भदंत शाक्यपुत्र राहुल यांनी व्यक्त केले. समाज व राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी घातक ठरलेल्या जातव्यवस्थेचा अंत करण्याचे कार्य भगवान गौतम बुद्धांनी केल्याचेही त्यांनी सांगितले.



बुद्ध पौर्णिमेनिमित्त ग्रामविकास प्रतिष्ठान व भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने धम्मवंदना व धम्मदेसना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सौंदाळा गावचे सरपंच शरद आरगडे यांना त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण व समाजहिताच्या कार्याबद्दल 'ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक मोहनराव गाडे जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच नगरसेवकपदी डॉ. जगदीश मुने व मनीषा उदमले निवडून आल्याबद्दल आणि प्रा. डॉ. आनंद घोंगडे यांनी पीएचडी पदवी संपादन केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास बौद्धाचार्य वसंत बोर्डे, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष पप्पू बोर्डे, जिल्हाध्यक्ष रोहिणी ठोंबे, मीनाताई शिंदे, कडूबाबा लोंढे, महेंद्र राजगुरू, सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी किशोर राजगुरू, अरविंद सोनटक्के, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे शशिकांत गायकवाड, जावेद पठाण, अशोक शिरसीम, एकनाथ ठोकळ, बौद्धाचार्य अरुण भोंगळे, रामदास सोनवणे आदींसह विविध कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना भदंत राहुल म्हणाले, सोन्याचा धूर निघणाऱ्या भारत देशाला जातीव्यवस्थेमुळे मोठा फटका बसला. विविध जाती-जमातींना एकत्र आणून रयतेचे राज्य निर्माण करणाऱ्या छत्रपतींच्या कार्यालाही जातीयतेच्या चौकटीत अडकविण्याचा प्रयत्न झाला. जातीव्यवस्थेमुळे माणसाच्या विकासाला अडथळा निर्माण झाला आहे. ते पुढे म्हणाले, गंगा, गोदावरी, नर्मदा, कावेरी, सरस्वती या नद्यांप्रमाणे विविध विचारप्रवाह असले तरी शेवटी सर्व नद्या समुद्रात मिळतात. बुद्धांचा धम्म हा त्या समुद्रासारखा असून सर्व विचारांना सामावून घेणारा आहे. त्यामुळे तो काळाच्या कसोटीवर टिकून राहिला आहे.

भगवान बुद्धांनंतर संत तुकाराम महाराजांनी अंधश्रद्धा व कर्मकांडावर प्रहार केला. सध्या देशात महापुरुषांचे दैवीकरण, विद्रूपीकरण व त्यांचे विचार संपवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अशा प्रवृत्तीविरोधात विचारांची चळवळ अधिक बळकट करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी सरपंच शरद आरगडे म्हणाले, भगवान गौतम बुद्धांच्या विचारांमुळे कर्मकांड, जुनाट रूढी व अंधश्रद्धा नष्ट करता येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बुद्धांचे परिवर्तनवादी विचार समाजाला योग्य दिशा देऊ शकतात. समाजाला बंधनात ठेवणारी व्यवस्था संपवून समतेच्या दिशेने वाटचाल करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य संयोजक प्रा. दिगंबर गाडे यांनी केले. सूत्रसंचालन पुरस्कारप्राप्त कवी हुमायून आतार यांनी केले, तर आभार प्रा. गौतम ढेकणे यांनी मानले.

## कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना पिक विम्याची ९.६६ कोटी नुकसान भरपाई : आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी–** कोपरगाव तालुक्यात मागील वर्षीच्या खरीप हंगाम २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे काढणीला आलेल्या खरीप हंगामातील पिके भुईसपाट होऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यावेळी झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याच्या सूचना महसूल आणि कृषी विभागाला दिल्या होत्या. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिक विम्याची जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळावी यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरु होता. त्या पाठपुराव्यातून कोपरगाव तालुक्यातील जवळपास १५ हजार शेतकऱ्यांना पंतप्रधान पिक विमा योजेन अंतर्गत उत्पादन आधारित ९.६६ कोटी नुकसान भरपाई रक्कम महायुती शासनाने मंजूर करून हि रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली आहे.



गेल्या वर्षीच्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे कोपरगाव तालुक्यातील अनेक गावांना अतिवृष्टीचा फटका बसून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. या अतिवृष्टीमुळे अनेक शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे काढणीला आलेल्या सोयाबीन, बाजरी, कापूस, तूर, चारा पिके आदी शेकडो हेक्टर पिकांचे मोठे नुकसान होवून खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला होता. सर्व पिके बहरात असतांना शेतकऱ्यांच्या पदरात काही तरी पडेल अशी अपेक्षा होती परंतु ऐन काढणीच्या वेळी खरीप पिकावर आलेल्या अतिवृष्टीच्या या नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांनी पाहिलेले स्वप्न चक्काचूर होवून अगोदरच अडचणीत असलेला शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला होता. या आर्थिक अडचणीतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी पिक विमा कंपनी कडून लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळावी यासाठी सातत्याने महायुती शासनाकडे पाठपुरावा सुरु होता.

त्या पाठपुराव्याची दखल घेवून महायुती शासनाने कोपरगाव तालुक्यातील नुकसानग्रस्त १५ हजार शेतकऱ्यांना ९.६६ कोटी नुकसान भरपाई रक्कम मंजूर केली आहे. त्यामुळे निश्चितच शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून खरीप हंगाम २०२६ च्या तयारीसाठी आर्थिक मदत होणार आहे. खरीप हंगामातील पिके उभे करण्यासाठी आवश्यक असलेले आर्थिक भांडवल उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंता दूर झाल्या आहेत. त्यामुळे नुकसान भरपाई मिळवून देणाऱ्या आमदार आशुतोष काळे यांचे कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी आभार मानले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ९.६६ कोटी नुकसान भरपाई रक्कम जमा झाल्यामुळे बळीराजा पुन्हा नव्या हिम्मतीने उभा राहणार आहे.

## बाबूजी आव्हाड महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत यश



**● पाथर्डी । वीरभूमी –** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे बोर्ड कडून बारावीचा निकाल ऑनलाईन नुकताच जाहीर करण्यात आला. या परीक्षेमध्ये बाबूजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयात कला शाखेत प्रथम क्रमांक शिरसे मारिया भीमराव (७५.५०%), द्वितीय डीसले गणेश नवनाथ (७३.६७%), तृतीय क्रमांक पवार महेश अण्णासाहेब (७०.१७%) वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक इंगळे वेदांत महेश (६७.८३%) द्वितीय चव्हाण गणेश विष्णू (६१.००%) आणि तृतीय काळोखे कृष्णा अण्णासाहेब (६०.१७%) तसेच विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक तुवर आरुष राजेंद्र (८५.१७%) द्वितीय लांडे आयुष भाऊसाहेब (८४.६७%) तर तृतीय हिरवे क्षितिज सुधीर (८०.१७%) तर एच एस सी होकेशनल शाखेत प्रथम क्रमांक चव्हाण ज्योती नवनाथ (६०.६७%), द्वितीय गायके मीरा हरिश्चंद्र (५७.००%) तृतीय अंबाडे आप्पासाहेब बाबा (५२.१७%) यांनी मिळविला. या सर्व विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात गुणगौरव करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. गुणवंत विद्यार्थ्यांचे पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड व सर्व कार्यकारिणी सदस्य यांनी अभिनंदन केले. याप्रसंगी पालक प्रतिनिधी डॉ. भाऊसाहेब लांडे, प्रा. राजेंद्र तुवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे पर्यवेक्षक सलीम शेख, सूत्रसंचालन प्रा. सुरेखा चेमटे, तर आभार प्रा. देवेंद्र कराड यांनी मानले.